मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दिनांक १७ फेब्रुवारी २०२४ । पान १

# युपीत योगीजी अन् महाराष्ट्रात देवेंद्रजी..!

## नराधम नौशाद शेखच्या अवैध बांधकामावर हातोडा

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

अत्याचारी, नराधमांचा बिमोड करण्यासाठी उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी कठोर पावले उचलली. चुकीची कामे करणाऱ्यांच्या अवैध बांधकामांवरती अक्षरशः बुलडोझर फिरवला. त्याच धर्तीवर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शैक्षणिक संस्थेतील मुलींचे लैंगिक शोषण करणाऱ्या नौशाद शेख सारख्या प्रवृत्तींना वचक बसवण्यासाठी त्याच्या अवैध बांधकामावरती हातोडा घातला. ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे, अशी खणखणीत प्रतिक्रिया भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी दिली आहे. रावेत येथील क्रिएटिव्ह अकॅडमीचा संस्थाचालक



नौशाद शेख याने अनेक अल्पवयीन मुलींवर लैंगिक शोषण केल्याचे उघडकीस आले होते. त्यामुळे पुणे जिल्ह्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रभर पिंपरी-चिंचवडची बदनामी झाली. अनेक निष्पाप मुलींना अत्याचाराचा सामना करावा लागला. त्यामुळे नौशाद शेख याची संस्था आणि बांधलेली इमारत याबाबत चौकशी करून त्याला धडा शिकवण्यासाठी कठोर कारवाई करावी, अशी मागणी शहरातील हिंदुत्ववादी संस्था संघटना आणि भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी केली होती. दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने या संस्थेच्या अतिक्रमणावर शुक्रवारी बुलडोझर चालविला आला. आरोपी नौशाद शेख याच्यावर पोलिसांमध्ये गुन्हा दाखल झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून या सगळ्या प्रकरणाची समांतर चौकशी सुरु केली. पोलिसांनी शेख याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. संबंधित पीडित मुलगी अल्पवयीन असल्याने पोलिसांनी पॉस्को आणि अन्य गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांची नोंद केली. यानंतर अशा नराधमांच्या संस्थेवर देखील कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी जाहीरपणे केली होती. अशा नराधमांच्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करावी यासाठी त्यांनी महापालिका प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कानावर देखील हा प्रकार घातला होता. त्यामुळे गृह खात्याकडून देखील या घटनेची गंभीर दखल घेण्यात आली. आमदार लांडगे यांनी इशारा दिल्याप्रमाणे आज महापालिकेच्या अनधिकृत कारवाई पथकाने क्रिएटिव्ह अकॅडमीच्या अनधिकृत बांधकामावर हातोडा फिरवला.

> “रावेत येथील क्रिएटिव्ह अकॅडमीचा संस्था चालक नौशाद शेख याने अनेक अल्पवयीन मुलींवर लैंगिक शोषण केल्याचे उघडकीस आले. त्यानंतर अशा प्रवृत्तींना शहरात कदापि थारा देवू नये आणि संबंधितांच्या बेकायदा संस्था व बांधकामांवर बुलडोझर फिरवणार, अशी ग्वाही पिंपरी-चिंचवडकरांना जाहीरपणे दिली होती. आज पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने त्या संस्थेच्या अतिक्रमणावर बुलडोझर चालविला. याबाबत पोलीस आणि महापालिका प्रशासनाचे तमाम हिंदू समाज संघटनांकडून कौतूक आहेच. पण, या नराधमावर आणखी कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी आमची भावना आहे.
>
> **– महेश लांडगे**, आमदार
> भोसरी विधानसभा, भाजपा पिंपरी- चिंचवड.

# महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये संरक्षक जाळी बसवा

## सुरक्षा उपाययोजना करा : शंकर जगताप

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील सर्व शाळांमध्ये सुरक्षा कठडे, खिडक्यांना सुरक्षा जाळ्या, उंच इमारतींमध्ये प्रत्येक मजल्यावर आडवी संरक्षक जाळी, औषधोपचाराची पेटी तसेच इतर सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी आयुक्त शेखर सिंह यांनी केली आहे.यासंदर्भात शंकर जगताप यांनी आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, महापालिकेच्या चिंचवडगाव येथील हुतात्मा चापेकर शाळेत आज अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. या शाळेतील आठवीचा विद्यार्थी सार्थक कांबळे हा शाळेच्या तिसऱ्या मजल्यावरून पडल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. ही महानगरपालिकेला विचार करायला लावणारी घटना आहे. महानगरपालिकेच्या



सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. महानगर पालिकेच्या शाळांमध्ये शिकणारे सर्व विद्यार्थी अत्यंत गोरगरीब घरातील असतात. या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची काळजी घेणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. चिंचवड गावातील हुतात्मा चापेकर शाळेत घडलेली दुर्दैवी घटना पुन्हा महानगरपालिकेच्या अन्य कोणत्याही शाळेत घडू नये यासाठी प्रशासनाने सतर्क होऊन आवश्यक उपाययोजना करावी.महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये सुरक्षा कठडे, खिडक्यांना सुरक्षा जाळ्या बसवावेत. महानगरपालिकेच्या बहुतांश शाळांच्या इमारती उंच आहेत. या उंच इमारतींमध्ये लहान मुले शिक्षण घेत असतात. मुले खोडकर असणे हे नैसर्गिक आहे. या खोडकरणातून एखादी दुर्दैवी घटना घडू शकते, याची या निरागस मुलांना कल्पना नसते. त्यामुळे खोडकरणातून एखादी घडलेली दुर्दैवी घटना टाळण्यासाठी महानगरपालिका शाळांच्या उंच इमारतींमध्ये प्रत्येक मजल्यावर आडवी संरक्षक जाळी सर्वात आधी बसविण्यासाठी खबरदारी महानगरपालिका प्रशासनाने घ्यावी. त्याचप्रमाणे सर्व शाळांमध्ये औषधोपचार पेटी व इतर आवश्यक सुरक्षा उपाययोजनाही व अग्निशमनासाठीची उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# पिंपरी-चिंचवड न्यायालय संकुलाच्या कामाचा अखेर 'टेकऑफ'

## जमीन सपाटीकरणाच्या कामाला सुरूवात; आ.महेश लांडगे यांनी केली पाहणी

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पिंपरी-चिंचवड न्यायालयाच्या इमारतीच्या कामाला आज अखेर सुरूवात झाली. त्यामुळे लवकरच प्रत्यक्ष इमारत उभारणीच्या कामाला सुरुवात होणार आहे. तत्पूर्वी, जमीन सपाटीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला. या कामाची भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पाहणी केली.यावेळी माजी महापौर राहुल जाधव, सामाजिक कार्यकर्ते निखील बोऱ्हाडे, निलेश बोराटे आदी उपस्थित होते. शहरासाठी स्वतंत्र न्यायालय संकूल असावे आणि पक्षकार तसेच



सर्वसामान्य नागरिकांना व विधीज्ञांना पुणे ऐवजी शहरातच खटल्यांचे कामकाज करण्याची सुविधा असावी या करिता आमदार महेश लांडगे यांनी २०१४ पासून सातत्याने पाठपुरावा केला. राज्य सरकारच्या मंजुरीसाठी विधानसभा अधिवेशनातील आवाज उठवला होता. पर्यावरण विभागासह राज्य सरकारच्या विविध विभागांची ना हरकत दाखला घेतल्यानंतर मोशी येथील सेक्टर १४ येथे इमारतीसाठी जागा उपलब्ध झाली. त्याचे सपाटीकरण आता सुरू आहे.दि. ८ मार्च १९८९ साली पिंपरी-चिंचवड न्यायालयाची स्थापना झाली. मात्र, अद्याप इमारतीचा प्रश्न मार्गी लागला नाही. पण, आमदार महेश लांडगे आणि पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या आजी-माजी अध्यक्षांच्या माध्यमातून सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यात आला. त्याला यश मिळाले असून आता न्यायसंकुलाची इमारत दृष्टीक्षेपात आली आहे. आमदार महेश लांडगे म्हणाले की, पुणे जिल्हा प्रमुख न्यायाधीश महेंद्र महाजन यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानंतर संबंधित ठेकेदार आणि पीडब्ल्यूडी विभागाच्या अधिकाऱ्यांना कामाबाबत सूचना केली. त्यानुसार प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाली. नवीन न्यायालय इमारतीमध्ये एकूण ९ मजले आणि अतिरिक्त सत्र न्यायालय होणार आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात एकूण ४ मजले आणि २६ कोर्ट हॉल अशी सर्व सुविधायुक्त इमारत शहराच्या वैभवात भर घालणार आहे. शहरातील वकीलांचे स्वप्न पूर्ण होत आहे, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला.

> "नवीन न्यायालयाच्या इमारतीमुळे भविष्यात पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वसामान्य नागरिकांचा वेळ, पैसा वाचेल. कामांना गती मिळेल. ही प्रशस्त इमारत पिंपरी-चिंचवड शहराच्या शिरपेचामध्ये मानाचा तुरा असेल, असा विश्वास वाटतो. पिंपरी-चिंचवडच्या सर्वांगीण विकासासाठी पाहिलेले आणखी एक महत्त्वाकांक्षी स्वप्न पूर्ण होत आहे, याचा विशेष आनंद आहे. पिंपरी-चिंचवड न्यायालयाच्या स्वतंत्र इमारतीसाठी सकारात्मक भूमिका घेणारे राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व 'महायुती' सरकारचे तमाम पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने आभार व्यक्त करतो.
>
> – **महेश लांडगे**, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीच्या 'स्वराज्य ज्योत'चे स्वागत

## 'जय भवानी, जय शिवाजी'चा जयघोष : शहरातील शिवप्रेमींचा उत्स्फूर्त सहभाग

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

मराठी भाषा समृद्ध करणारे जगद्गुरू संत तुकाराम महाराज आणि शूरता, वीरता, पराक्रमाचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भेटीचे स्मृतिस्थळ भक्ती-शक्ती शिल्पसमूह इथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आयोजित 'स्वराज्य रथ' आणि 'स्वराज्य ज्योत' पोहोचली. पिंपरी चिंचवड शहर



पदाधिकाऱ्यांनी 'स्वराज रथा'चं ढोल ताशा गजरात जल्लोषात स्वागत करत फुलांचा वर्षाव करण्यात आला. तसेत 'जय भवानी, जय शिवाजी' या घोषणेने संपूर्ण भक्ती-शक्ती चौक परिसर दुमदुमून गेला. पिंपरी चिंचवड शहरातील नाशिक फाटा येथे पिंपरी चिंचवड कार्याध्यक्ष शाम लांडे यांनी 'स्वराज रथा'चं उत्साहात स्वागत केलं. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी, सरचिटणीस बाप्पा सावंत, सेवादल सेलचे राज्यप्रमुख राजेंद्र लावांघरे, पिंपरी चिंचवड शहरध्यक्ष अजित गव्हाणे, कार्याध्यक्ष राहुल भोसले, पिंपरी चिंचवड खजिनदार दीपक साकोरे, युवक शहर अध्यक्ष शेखर काटे तसेच शिवप्रेमींसह पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खेड तालुक्यातील राजगुरुनगर, चाकण, आळंदी शहरात सांस्कृतिक सभागृह उभारा!

## आम आदमी पार्टी युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष मयूर दौंडकर यांची मागणी



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** खेड तालुक्यात आळंदी ही जुनी नगरपालिका असून महाराष्ट्रातील एक महत्वाचे तीर्थक्षेत्र आहे. तसेच चाकण, राजगुरुनगर या नगरपालिका अलीकडील कालखंडात अस्तित्वात आलेल्या आहेत. चाकण औद्योगिक दृष्ट्या महत्वाचे शहर असून महत्वाची बाजारपेठ आहे. राजगुरुनगर हे ऐतिहासिक तसेच तालुक्याचे ठिकाण/प्रमुख शहर आहे. खेड तालुक्याला ऐतिहासिक, सांस्कृतिक, वारसा असून सांस्कृतिक वारसा जतन करून वृद्धिगत करण्यासाठी नागरिकांसाठी सांस्कृतिक नाट्यगृह/ सभागृह स्थापनेची गरज आहे. या तीनही नगरपालिका क्षेत्रात सांस्कृतिक नाट्यगृह/ सभागृह प्रस्थापित झाले तर नाट्य, कला ,अभिनय, व इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे व त्याचा आस्वाद घेणे शक्य होणार आहे. याशिवाय यातून स्थानिक नगरपालिकांना उत्पन्नाचे स्त्रोतही निर्माण होणार आहे. स्थानिक नगरपालिकेतील सामान्य नागरिक कर भरत असून त्यांना योग्य त्या सुविधा उपलब्ध करून देण्याची प्रमुख कर्तव्य नगरपालिकांचे आहे. यासाठी तालुक्यातील आळंदी, चाकण, खेड,नगरपालिका हद्दीत स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार/गरज म्हणून सांस्कृतिक नाट्यगृह/ सभागृह सुरू करण्यात यावे.

अशी मागणी निवेदनाद्वारे तालुक्याचे नायब तहसीलदार आर.बी. बिजे यांच्याकडे आम आदमी पार्टी खेड- आळंदी विधानसभा यांच्या वतीने करण्यात आली. यावेळी आम आदमी पार्टीचे युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष मयूर मगन दौंडकर तसेच श्री. दत्तात्रय ढेरंगे, श्री. सुधीर डावरे उपस्थित होते.

> “खेड आळंदी विधानसभा क्षेत्रातील नागरिकांचे जीवनमान उंचवण्यासाठी पायाभूत सुविधा पुरवणे हे शासनाचे आद्यकर्तव्य आहे. आज पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही मेट्रो सिटीलगत असणाऱ्या खेड तालुक्याची दयनीय अवस्था झालिये. कुठल्याही प्रकारच्या पायाभूत सुविधा आज या ठिकाणी देण्यात येत नाहीयेत. आम आदमी पार्टी नागरिकांना दर्जे दार पायाभूत सुविधा मिळव्यात म्हणून नेहमीच झगडत राहील.
>
> — मयुर दौंडकर,
> प्रदेशाध्यक्ष आम आदमी पार्टी युवा आघाडी महाराष्ट्र राज्य.

# बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकरी चिंतेत

## शेतकऱ्यांचे वन विभागाला दिला अल्टिमेटम

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरीकरणा मुळे वन्यजीवांचे क्षेत्र कमी होत आहे. त्यामुळे वन्य आणि मानवातील संघर्ष वाढला आहे. आज बिबट्याचा मुक्त संचार मानवीवस्तीकडे होताना दिसत आहे. कारण, मानवाकडून झालेली जंगलतोड, वृक्षतोड, जंगलामध्ये झालेलं अतिक्रमण यामुळे वन्यप्राण्यांची मानवी वस्तीकडे वाटचाल पाहायला मिळत आहे. जावली तालुक्यातील आलेवाडी परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून बिबट्याचा मुक्त संचार होत असून पाळीव प्राणी, श्वानावर हल्ला करुन भक्ष करीत असल्याने नागरिक दहशतीखाली वावरत आहेत. मालदीव घाटात बिबट्या मुक्तपणे संचार करत असल्याने रानात जनावरे चारण्यासाठी घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. जावली तालुका हा वनसंपदेने समृद्ध आहे. इथे वनसंपदे सोबतच वन्यजीव सुद्धा इथे भरपूर आहेत. मात्र आजकाल वन्यजीव मानवी वस्तीत घुसून पाळीव प्राणी,



गोधन, व माणसांवर हल्ले करण्याचे प्रकार वारंवार होत आहेत. सर्व होत असताना वनविभाग मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. काल रात्री सात वाजता जावली तालुक्यातील आलेवाडी ता. जावली, जि. सातारा येथे एका बिबट्याने कुत्र्यावर हल्ला करत त्याला जखमी केले. अशा घटना वारंवार या परीसरात घडत असताना वन विभाग मात्र मुग गिळून गप्प बसले आहे. आलेवाडी येथील नागरिकांनी वारंवार वन विभागाला या हिंस प्राण्यांच्या बंदोबस्त करण्यासाठी अनेक वेळा निवेदन देण्यात आले आहे. मात्र वन विभाग यावर नागरिकांना सांगत आहे की वन्य प्राण्यांना काही करू नका. आलेवाडी, मालदेव, मेढा घाटात, मरडमुरे या ठिकाणी रोज बिबट्याचे दर्शन होत आहे. आज पाळीव प्राण्यांवर हल्ले होत आहेत. देव न करो उद्या जर एखाद्या लहान मुलाला घेऊन गेला तर किंवा शेतात काम करणाऱ्या महिलेवर किंवा माणसावर हल्ला तर, काय असा प्रश्न सर्व सामान्य जनतेतून विचारला जात आहे. जर याचा लवकरात लवकर बंदोबस्त नाही केला तर सामान्य जनता वन विभागला झोपेतून जागे करण्यासाठी रस्त्यावर उतरेल, असा इशारा येथील ग्रामस्थांनी दिला आहे.

# कृत्रिम प्रज्ञेमुळे भविष्यात मोठी स्थित्यंतरे

## नोबेलविजेते अर्थतज्ज्ञ मायकेल स्पेन्स यांचे प्रतिपादन

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

भविष्यातील काळ हा यंत्र आणि मानव यांच्यातील सहकार्याचा असणार आहे. कृत्रिम प्रज्ञेमुळे (एआय) आतापर्यंत काही मोजक्या लोकांपुरता मर्यादित असलेला तंत्रज्ञानाचा ओघ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला आहे. या तंत्रज्ञानामुळे अनेक क्षेत्रांत मोठी स्थित्यंतरे घडणार असून, मानवी जीवनावर त्याचा मोठा परिणाम होईल. त्यामुळे त्यातील धोक्यांचाही विचार करावा लागेल, असे प्रतिपादन नोबेल पुरस्कारविजेते अर्थतज्ज्ञ मायकेल स्पेन्स यांनी शुक्रवारी केले.गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेमध्ये ८४ व्या काळे




स्मृती व्याख्यानात स्पेन्स बोलत होते. या वेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर आणि संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे उपस्थित होते. स्पेन्स यांनी महत्त्वाच्या संशोधनामुळे होणारे स्थित्यंतर या वेळी उलगडून दाखविले. ते म्हणाले, की नवीन तंत्रज्ञानामुळे या पिढीला विकासाच्या नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे सर्वंकष आणि शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल करणेही शक्य होत आहे. डिजिटल स्थित्यंतरामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात बदल झाला असून, सर्वजण त्याचा भाग आहेत. हे तंत्रज्ञान सर्वांना सहजी उपलब्ध होणारे आणि मोफत मिळणारे आहे.कृत्रिम प्रज्ञा ही आता मानवी मनाप्रमाणे कार्य करते. एकच तंत्रज्ञान आता भारतीय इतिहास, इटलीतील रेनेसाँ आणि कॉम्प्युटर कोडिंग याबाबत माहिती देऊ शकते. विशेष म्हणजे अब्जावधी डॉलर खर्च करून संशोधन करणाऱ्या बड्या कंपन्यांपुरते हे तंत्रज्ञान मर्यादित नाही. या तंत्रज्ञानाचा वापर सर्वांना शक्य आहे. सध्या कृत्रिम प्रज्ञेची क्षमता विकसित करत असताना ती मानवी क्षमता डोळ्यांसमोर ठेवून केली जात आहे. परंतु, भविष्यात मानवी क्षमतेपेक्षा जास्त पातळीवर ही क्षमता विकसित केली गेल्यास ती परिस्थिती धोकादायक ठरू शकते. त्यासाठी नजीकच्या भविष्यात नियंत्रण किंवा नियमनाची गरज भासेल. ही गरज विविध देशांसाठी त्यांच्या स्थानिक निकषांनुसार वेगवेगळी असेल, असे स्पेन्स यांनी सांगितले.कृत्रिम प्रज्ञेमुळे ‘इमेज रिकग्निशन’ शक्य झाले आहे. प्रथिनांची त्रिमितीय रचना तयार करणे ही अवघड बाब असते. काही संशोधकांनी कृत्रिम प्रज्ञेचा वापर करून हे शक्य करून दाखविले.

> **“कृत्रिम प्रज्ञेबद्दल सर्वसामान्य माणसांच्या मनात भीती आहे. या तंत्रज्ञानामुळे आपला रोजगार हिरावला जाईल, असे त्यांना वाटत आहे. खासगी क्षेत्र या तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. याच वेळी सार्वजनिक क्षेत्र याबद्दल अजून साशंक दिसत आहे.**
> **– मायकेल स्पेन्स, ‘नोबेल’विजेते अर्थतज्ज्ञ**

यामुळे २० कोटींहून अधिक प्रथिनांच्या त्रिमितीय रचना तयार करणे शक्य झाले असून, जगभरात सर्व संशोधकांना संशोधनासाठी ही साधने मोफत उपलब्ध आहेत. यामुळे आगामी काळात जैववैद्यकीय क्षेत्रात मोठी उलथापालथ घडणार आहे, असे स्पेन्स यांनी नमूद केले. भविष्यातील काळ हा यंत्र आणि मानव यांच्यातील सहकार्याचा असणार आहे. कृत्रिम प्रज्ञेमुळे (एआय) आतापर्यंत काही मोजक्या लोकांपुरता मर्यादित असलेला तंत्रज्ञानाचा ओघ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला आहे. या तंत्रज्ञानामुळे अनेक क्षेत्रांत मोठी स्थित्यंतरे घडणार असून, मानवी जीवनावर त्याचा मोठा परिणाम होईल. त्यामुळे त्यातील धोक्यांचाही विचार करावा लागेल, असे प्रतिपादन नोबेल पुरस्कारविजेते अर्थतज्ज्ञ मायकेल स्पेन्स यांनी शुक्रवारी केले.

# राज्य सरकारला मराठा आंदोलनाची धास्ती

## जालना येथील लाठीमाराच्या घटनेनंतर मराठा समाजात सरकारबद्दल रोष

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

जालना येथील लाठीमाराच्या घटनेनंतर मराठा समाजात राज्य सरकारबद्दल प्रचंड रोष निर्माण झाला होता. मराठा आरक्षणाबद्दल खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा करून काढलेल्या मसुद्यावर मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे यांचे समाधान झाले नसून विविध मागण्यांच्या अंमलबजावणीसाठी ते पुन्हा उपोषणाला बसले आहेत. याचे पडसाद शिवनेरीवर होणाऱ्या श्री शिवजयंतीच्या शासकीय




कार्यक्रमात होण्याची शक्यता गृहीत धरून प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.दरवर्षी शासनाकडून १९ फेब्रुवारी रोजी श्री शिवजयंतीचा शासकीय कार्यक्रम शिवनेरी किल्ल्यावर मोठ्या उत्साहात होत असतो. सध्या मराठा आरक्षणाच्या मागणीवरून राज्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. जालन्यातील लाठीमाराच्या घटनेनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माफी देखील मागितली होती. या घटनेचे तीव्र पडसाद उमटले होते. मराठा आरक्षणाच्या मागणीवरून जरांगे यांनी देखील आक्रमक पवित्रा घेऊन मुंबईकडे वाटचाल केली होती. मुख्यमंत्री शिंदे यांनी जरांगे यांच्या मागण्या मान्य करत मसुदाही प्रसिद्ध केला. तसेच राज्य मागासवर्ग आयोगाच्या अहवालानुसार विधिमंडळाचे अधिवेशनही बोलाविण्यात आले आहे. मात्र, आरक्षणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी जरांगे यांनी उपोषणाला सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर होणाऱ्या सोमवारी (१९ फेब्रुवारी) होणाऱ्या श्री शिवजयंतीच्या कार्यक्रमात लाखो नागरिक येत असतात. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत.या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, म्हणून शिवनेरीवरील मुख्य सभेच्या ठिकाणात बदल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे याकरिता भारतीय पुरातत्त्व विभागानेही (एएसआय) तातडीने परवानगी दिली आहे. याकरिता जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे हे दोन दिवस जुन्नर येथे स्वत: सर्व व्यवस्था पाहण्यासाठी हजर होते. कोणतीही अनुचित घटना घडू नये, म्हणून ग्रामीण पोलिसांकडून चोख बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला आहे.